"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

## विवेकानंद ज्युनिअर कॉलेज, कोल्हापूर

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

कोल्हापूर

# अ ह वा ल

### गौरी - गणपती विसर्जन व निर्माल्य व्यवस्थापन उपक्रम

गुरुवार दि.12.09.2024 रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राजाराम बंधारा, कसबा बावडा, कोल्हापूर या ठिकाणी पंचगंगा नदी घाटावर पर्यावरणपूरक विसर्जन कुंडात सार्वजनिक घरगुती गौरी- गणपतीचे विसर्जन, गणेशमूर्ती, निर्माल्य संकलन असा आदर्श उपक्रम संपन्न झाला.

दुपारी 3 वाजल्यापासून परिसरातील भाविकांनी वाजत-गाजत घरगुती गौरी गणपतीला जड अंतकरणाने निरोप दिला. कसबा बावडा परिसरातील सर्व सुज्ञ नागरिकांनी पर्यावरणाचे रक्षण, जल प्रदूषण रोखण्यासाठी गणेश मूर्ती व निर्माल्य नदीत विसर्जित न करता पर्यावरण पूरक विसर्जन कुंडात विसर्जित केले व समाजाला एक नवा आदर्श घालून दिला. पाणी म्हणजे जीवन त्यामुळे स्वतःच्या हाताने स्वतःच्या पायावर कुऱ्हाडीने घाव घालण्यासारखे हे कृत्य आहे अशी सर्वांना जाणीव झाली. आपल्याला जगवणाऱ्या या नदीमातेचे आपणच रक्षण केले पाहिजे. जलसुरक्षा काळाची गरज आहे या भावनेने या सांस्कृतिक उत्सवांमध्ये गौरी- गणपती व.निर्माल्य यांचा एकत्र संचय करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लागली पाहिजे या दृष्टीकोनातून समाजसेवेचे व्रत हाती घेतलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी भाविकांच्या विसर्जित केलेल्या गणेशमुर्त्या, गौरी व निर्माल्य इत्यादी एकत्र करून कोल्हापूर महानगरपालिकेच्या वतीने पुरविण्यात आलेल्या वाहनांमध्ये सुरक्षित पद्धतीने भरून योग्य ठिकाणी गणेश मुर्त्या व निर्माल्य याची विल्हेवाट लावण्यात आली. या पर्यावरणपूरक विसर्जन उपक्रमा मध्ये जवळजवळ 1500 गणेश मुर्त्या व 4 ट्रॅक्टर निर्माल्य एवढे संकलन करून पर्यावरण रक्षणासाठी या स्वयंसेवकांनी समाजाला मोठा आदर्श घालून दिला. सदर सेवाभावी कार्यात कनिष्ठ व वरिष्ठ विभाग राष्ट्रीय सेवा योजनेतील 70 ते 80 स्वयंसेवक कार्यरत होते.

या कार्यक्रमाला कॉलेजचे प्राचार्य मा.डॉ. आर. आर. कुंभार यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. कॉलेजचे प्रबंधक श्री आर बी जोग यांचेही सहकार्य लाभले. या कार्यक्रम प्रसंगी वरिष्ठ विभागातील कार्यक्रम अधिकारी प्रा.संदीप पाटील, प्रा.पी.आर.बागडे, प्रा.डॉ.कैलास पाटील, प्रा विठ्ठल पाटील, , ज्युनिअर विभागातील कार्यक्रम अधिकारी प्रा. श्री एल. एस. नाकाडी यांच्या प्रेरणेतून स्वयंसेवकांनी या पर्यावरणपूरक विसर्जन कार्यात सहभाग घेऊन आपले बहुमोल कर्तव्य पार पाडले. अशाप्रकारे पर्यावरण पूरक गौरी-गणपती विसर्जन व निर्माल्य व्यवस्थापन हा उपक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

| | |
|---|---|
| श्री एल. एस. नाकाडी | डॉ. आर. आर. कुंभार |
| **PROGRAMME OFFICER** | **प्राचार्य** |
| **N. S. S + 2** | **विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.** |
| **VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR** | **(अधिकारप्रदत्त स्वायत्त)** |

गौरी गणपती विसर्जन व निर्माल्य विसर्जन








